# भुयारी मेट्रोसाठी पावसाळ्यात विशेष काळजी

▮ नम्रता सावंत कदम

**मुंबई :** मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गाचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. मे २०१९ महिन्याच्या एमएमआरसीएलकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या न्यूजलेटरमध्ये पावसाळ्यातील विशेष काळजीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ किमी मार्गिकेच्या भुयारीकरणाचे ५० टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती जूनच्या पहिल्या आठवड्यात एमएमआरसीएलकडून देण्यात आली होती. पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक स्टॉर्म वॉटर ड्रेन्सचे काम वेगाने सुरू आहे. तर ऐन पावसाळ्यात वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बॅरिकेटिंग, सिग्नलिंग आणि डायव्हर्जन सुविधा नियोजनात्मक पद्धतीने करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

मेट्रो ३ च्या प्रत्येक स्थानकामध्ये



पावसादरम्यान साठणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी ३ एचपी ते ३५ एचपी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मान्सूनदरम्यान विद्युतीय व संचार व्यवस्था कायम राखण्यासाठी एमएमआरसीएल इतर यंत्रणेशी समन्वय साधणार आहे. एमएमआरसीच्या माध्यमातून सुरू असलेल्या मेट्रोचे काम वाहतुकीच्या पर्यायांमध्ये मोलाची भर घालणार आहे. त्यामुळे या कामांदरम्यान कोणत्याही प्रकारचा अपघात तसेच अडथळे निर्माण झाल्यास त्यावर तत्काळ उपाययोजना राबवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेची मदत घेण्यात येणार आहे. पावसाळ्यातील आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आली आहे.

■ पूरजन्य परिस्थितीत वाहनांच्या सुरक्षिततेसाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान कोणत्याही प्रकारचे पाणी साचू नये तसेच बांधकामाची ठिकाणे सुरक्षित राहवीत, यासाठी दक्ष राहणार असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी दिली आहे.

■ दोन अभियंते व पर्यवेक्षक असे प्रत्येक बांधकाम स्थळावर २४ तास तैनात राहणार असून, पालिकेचे स्थानिक कार्यालय आणि आपत्कालीन व्यवस्थापन विभागाशी दररोज समन्वय साधला जाईल, असेही एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले आहे.